पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक - २

सभावृत्तांत

दिनांक - ०६/०८/२०१४ वेळ - दुपारी ४.१० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०६/०८/२०१४ रोजी दुपारी ४.१० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१)** मा. ननवरे जितेंद्र बाबा - **सभापती**
२) मा. तानाजी विठ्ठल खाडे
३) मा. लोंढे शुभांगी संतोष
४) मा. मोटे किरण बाळासाहेब
५) मा. सुपे आशा रविंद्र
६) मा. सौ.साळुंके सविता सुरेश
७) मा. गिता सुशिल मंचरकर
८) मा. बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बोदाडे - प्रशासन अधिकारी, मा.पानसरे - क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या मान्यतेने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.४) मानधनावर संगणक चालक घेणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) मनपा सेक्टर २६ आकुर्डी येथील लॉनटेनिस कोर्ट क्र.१ व २ भाडेतत्वार देणेबाबत मा.सविता साळुंके, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **०२/०८/२०१४** रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमाक १)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक - ५ विषय क्रमांक - १
दिनांक - ०६/०८/२०१४ विभाग - क्रीडा
सुचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/२६६/२०१४, दि.०७/०७/२०१४

विषय : मनपा ११ जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, देखभाल व यांत्रिक दुरुस्ती पाचव्या वर्षाचे पुढील काम चौथ्या वर्षाचे दराने करुन घेणेबाबत...

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६ विषय क्रमांक - २
दिनांक - ०६/०८/२०१४ विभाग - क्रीडा
सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/७/कावि/२४०/२०१४, दि.१५/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा. महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२, दि.०४/०७/२०१३ मध्ये नमुद केलेप्रमाणे खेळाडू दत्तक योजने अंतर्गत खेळाडू निवड व खेळाडूंना लाभ देण्यासाठी नेमलेल्या समितीने दि.०३/०७/२०१४ रोजी दुपारी २.३० वा. मा.अतिरिक्त आयुक्त यांचे अध्यतेखाली मा.आयुक्त कक्ष येथे आयोजित केलेल्या सभेत, घेतलेल्या क्रीडा धोरण निर्णयानुसार खेळाडू दत्तक योजना २०१३-१४ अनुषंगाने प्राप्त १०३ अर्जांपैकी २१ पात्र खेळाडूंना खेळाडू दत्तक योजना २०१३-१४ चा लाभ हा २ वर्षाकरिता देणेस व त्याकामी येणा-या र.रु.६०,००,०००/-(अक्षरी र.रु.साठ लाख फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७ विषय क्रमांक - ३

दिनांक - ०६/०८/२०१४ विभाग - क्रीडा

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.गिता मंचरकर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/३७४/२०१४, दि.२८/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१४-१५ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.फ्लेक्स बॅनर, पंच मानधन, पंच चहा अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पुजाखर्च, स्टेशनरी खर्च, फक्की, क्रीडा साहित्य खरेदी, स्पर्धा आयोजन सभा चहापान, साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे इतर खर्च इ.सन २०१४-१५ मध्ये विभागस्तर स्पर्धेसाठी मनपा शाळेतील अंदाजे ३०० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर १५०, राष्ट्रीय पातळीवर ५० व संघटनेमार्फत आयोजित क्रीडा स्पर्धेसाठी ५० शालेय खेळाडू, त्यांचे समवेत जाणारे क्रीडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च, दैनिक भत्ता, प्रवेश फी औषध खर्च इ.अदा करणेकामी अंदाजे र.रु.१,००,०००/- असे एकूण येणा-या संभाव्य खर्च ११,४९,९२५/-(अक्षरी र.रु.अकरा लाख एकोणपन्नास हजार नऊशे पंचवीस फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च क्रीडा निधी वार्षिक क्रीडा स्पर्धा, क्रीडा कला साहित्य या लेखाशिर्षावर केलेल्या एकूण तरतूद र.रु.४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस तसेच शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था ध्वनी/विद्युत व्यवस्था, मैदान तयार करणे, व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरुपाचा खर्च हा क्षेत्रिय कार्यालयामार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च संबंधित विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय अंदाजपत्रकातून खर्ची टाकणेस मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८ विषय क्रमांक - ४

दिनांक - ०६/०८/२०१४ विभाग - क्रीडा

सुचक - मा.निलेश बारणे अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/६/कावि/२४७/२०१४, दि.२९/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शिवराज मुद्रा प्रतिष्ठान या संस्थेस पै.धोंडिबा ऊर्फ गणपत फुगे (पाटील) मैदान सँडविक कॉलनी भोसरी हे मैदान व मैदान परिसरातील हॉल दि.१९/१०/२०१३ ते १८/०९/२०१४ अखेर ११ महिने कालावधीसाठी पुर्वीचे करारनाम्यातील अटी व शर्ती कायम ठेऊन पुर्वीप्रमाणेच

सेवाशुल्क रकमेत वाढ न करता दरमहा र.रु.२५,०००/- (अक्षरी र.रु.पंचवीस हजार फक्त) सेवाशुल्क देऊन मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ९ विषय क्रमांक - ५

दिनांक - ०६/०८/२०१४

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.आशा सुपे

संदर्भ : मा.सविता साळुंके, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्रीडा समितीच्या सभापती पदावर दिनांक ०२/०८/२०१४ रोजी सभापतींची निवड झाली असून क्रीडा समितीचे कामकाज सुरु झालेले आहे. तरी सदर समिती मार्फत विविध प्रकारचे क्रीडा विभागाशी संबंधित ठराव, विविध खेळांचे महापौर चषक स्पर्धा, आंतरशालेय क्रीडा स्पर्धा, तसेच नव्याने समाविष्ट झालेले खेळाडून दत्तक योजना याबाबतचे कामकाज व पत्रव्यवहार करावा लागतो. त्यासाठी क्रीडा समितीकडे संगणक चालक असून शिकाऊ उमेदवार म्हणून कार्यरत आहे. त्यांची मुदत माहे १० ऑक्टोंबर २०१४ पर्यंत आहे. त्यापुढील कालावधीकरीता श्री.सुरज प्रकाश झेंडे, संगणक चालक यांची र.रु.१०,०००/- मानधनावर नेमणूक मनपा नियमानुसार घेणेस मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १० विषय क्रमांक - ६

दिनांक - ०६/०८/२०१४

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा. सविता साळुंके, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -

विषय - मनपाचा सेक्टर २६ आकुर्डी येथील लॉन टेनिस कोर्ट क्र.१ व २ हे कोर्ट भाडेकराराने चालविणेस देणेबाबत..

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( ननवरे जितेंद्र बाबा )**
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६६१/२०१४
दिनांक : ०७/०८/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Krida-14-15\proceeding1_Krida 2.doc

